स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्य विद्या शाखेतील राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर केल्या जाणाऱ्या शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधन शिर्षक

"नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या सामाजिक, राजकीय विचार व कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास"

संशोधक

सौ. प्रगती रामराव डांगे

मु.पो. मुखेड ता. मुखेड जि. नांदेड

संशोधन मार्गदर्शक

डॉ. रत्नाकर बाबुराव लक्षटे

प्राध्यापक व विभाग प्रमुख

पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग

देगलुर महाविद्यालय, देगलुर.

ता. देगलुर जि. नांदेड

संशोधन केंद्र

राज्यशास्त्र संशोधन केंद्र,

देगलुर महाविद्यालय, देगलुर

ता. देगलुर जि. नांदेड

“नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या सामाजिक, राजकीय विचार व कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास”

1. प्रस्तावना (Introduction)

भारताचा राजकीय, सामाजिक वारसा समृद्ध करण्यामध्ये अनेक थोर राष्ट्रपुरुषांचे योगदान लाभले आहे. महाराष्ट्राची राजधानी आणि भारताची आर्थिक राजधानी म्हणून मुंबई चा उल्लेख केला जातो परंतु मुंबईला खऱ्या अर्थाने सर्वांगीण क्षेत्रात समृद्ध करण्यासाठी ज्या महामानवांनी क्रांती घडवून आणली त्यामध्ये नाना जगन्नाथ शंकरशेट हे अग्रस्थानी आहेत. म्हणूनच आचार्य अत्रे यांनी ‘मुंबईचा अनभिषिक्त सम्राट’ असा नाना जगन्नाथ शंकरशेट यांचा उल्लेख केला आहे.

नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे खरे नाव जगन्नाथ शंकर मुरकुटे यांचा जन्म 10 फेब्रुवारी 1803 रोजी महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यामधील मुरबाड येथे झाला. नाना जगन्नाथ शंकरशेट यांनी 1852 मध्ये स्थापन केलेल्या बॉम्बे असोसिएशनमुळे पश्चिम भारतात पहिली सर्वसमावेशक राजकीय चळवळ सुरू झाली. पुढे याच बॉम्बे असोसिएशनच्या सदस्यांनी इंडियन नॅशनल काँग्रेसची स्थापना केली. नाना जगन्नाथ शंकरशेट यांनी 1830 च्या सतीबंदी कायद्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. नाना जगन्नाथ शंकरशेट यांना 1835 मध्ये ‘जस्टिस ऑफ द पीस’ या पदवीने सन्मानित करण्यात आले. तसेच नाना जगन्नाथ शंकरशेट हे ‘ दि बॉम्बे ब्रांच ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटीचे ’ सभासद होते. 1845 मध्ये ‘स्टुडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी’ संस्थेची स्थापना केली. 1848 मध्ये नाना जगन्नाथ शंकरशेट यांनी स्वतःच्या घरात मुलींची शाळा सुरू केली व स्त्री शिक्षणाचा पाया रचला.

राजकीय कार्याबरोबरच अनेक सामाजिक सुधारणा नाना जगन्नाथ शंकरशेट यांनी केल्या. 16 एप्रिल 1853 ला मुंबई ते ठाणे या मार्गावर आशियातील पहिली रेल्वे धावली ती नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या अथक प्रयत्नामुळेच. 1862 मध्ये मुंबई चिंचपोकळीमध्ये भारतातील पहिली गॅस कंपनी उभारण्याचे श्रेय नाना जगन्नाथ शंकरशेट यांना जाते. ज्यामुळे 1866 ला गॅसचे दिवे पेटले आणि मुंबई उजळून निघाली.

नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्याकडे असलेली मोक्याच्या ठिकाणांवरची जमीन सरकारला त्यांनी दान केली. त्या जागांवर महत्वाच्या इमारती उभ्या राहिल्या. मुलींची शाळा, एल्फिस्टन कॉलेज, वैद्यकीय आणि कायदेविषयक महाविद्यालय हॉस्पिटल, बँका, गॅस

लाईट व रेल्वे अशा अनेक सामाजिक तथा राजकीय गोष्टींचा वारसा नाना जगन्नाथ शंकरशेट यांनी समाजाला दिला. त्या दृष्टीने नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे राजकीय, सामाजिक विचार व कार्य समाजापुढे आणण्याच्या दृष्टीने या संशोधन विषयाची मांडणी केली आहे.

2. संशोधन समस्या (Research Problem)

राज्यशास्त्र या विषयाचा संशोधक विद्यार्थी म्हणून शासन, राजकारण व व्यक्तीचे राजकीय वर्तन याच्याशी संबंधित विविध घटकांचा अभ्यास करणे प्राथमिक कर्तव्य आहे. या कर्तव्याचा एक भाग म्हणून मी आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्या ज्या व्यक्तिमत्वांनी आपले योगदान दिलेले आहे त्याबाबत विचार करीत असताना विविध व्यक्तिमत्व माझ्यासमोर येतात त्यामध्ये महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, नाना जगन्नाथ शंकरशेट, यशवंतराव चव्हाण इ. परंतु वरील व्यक्तिमत्वांपैकी नाना जगन्नाथ शंकरशेट वगळता इतर सर्व व्यक्तिमत्वाच्या विचार, कार्य व त्यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीतील योगदानाबाबत अनेक लिखाण व संशोधनपर कार्य झाले आहे. परंतु नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे व्यक्तिमत्व, विचार व कार्य प्रकाशात आलेले दिसत नाही. ते या संशोधनाच्या माध्यमातून प्रकाशात यावे व नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या व्यक्तिमत्व, विचार व कार्याची नव्या पिढीस, वर्तमान शासनास व राजकीय नेतृत्वास ओळख व्हावी या हेतूने मी हा विषय संशोधनासाठी निवडला आहे. नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या व्यक्तिमत्वातील राष्ट्रपुरुष, राष्ट्रनिर्माता, समाज सुधारक, व्यवस्थापन क्षेत्रातील गुरु इ. भूमिकांमधून समाजाला राष्ट्रवाद, समाजवाद, समाजसुधारणा या विचारांची आजच्या समाजाला अधिक गरज आहे असे मला वाटते. म्हणून मी **“नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या सामाजिक, राजकीय विचार व कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास** ” हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्यासारखे दातृत्व, कर्तृत्व व नेतृत्व वर्तमान राजकारणी व समाज सुधारण्याच्या कार्यात कार्यरत असणाऱ्यांना ओळख करून देण्याच्या हेतूने **“ नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या सामाजिक व राजकीय विचार व कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास ”** हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

3. संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of Research)

1) नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या जीवन चरित्राचा अभ्यास करणे.
2) नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या काळातील सामाजिक व राजकीय परिस्थितीचा आढावा घेणे.
3) नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्यावरील प्रभावाचा अभ्यास करणे.
4) नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या सामाजिक व राजकीय विचारांचा अभ्यास करणे.
5) नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या सामाजिक व राजकीय योगदानास समजून घेणे.
6) नाना जगन्नाथ शंकरशेट यांनी मुंबई शहराच्या जडणघडणीस दिलेल्या योगदानास समजून घेणे.
7) नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या सामाजिक व राजकीय विचारांची वर्तमानातील उपयुक्तता आणि प्रासंगिकता तपासणे.

4. गृहीतके (Hypothesis of Research)

प्रस्तुत संशोधन विषयाचे खालील गृहीतकांना प्रमाण मानून मांडणी करण्याचा मानस आहे.

1) नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे व्यक्तिमत्व समाजवाद व राष्ट्रवादाच्या विचाराने प्रेरित होते.
2) नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे मुंबई शहराच्या जडणघडणीत योगदान आहे.
3) नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे विचार पुरोगामी व सुधारणावादी होते.
4) नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे कार्य वर्तमानातील नेतृत्वासाठी मार्गदर्शक व प्रेरणादायी आहे.
5) नाना जगन्नाथ शंकरशेट हे उत्तम व्यवस्थापक व उद्योजक होते.

5. पूर्व संशोधनाचा आढावा (Review of Literature)

नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे जीवन चरित्र विचार व कार्य यांना संशोधनाच्या चौकटीत राहून स्पष्ट करण्याचा प्रयत्न यापूर्वी झाल्याचे तथ्य संकलनाच्या दरम्यान दिसून आले नाही. परंतु नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्यावर खालील प्रमाणे ग्रंथ स्वरुपात लिखाण झाले आहे.

1. श्रीमंत नामदार जगन्नाथ शंकरशेट उर्फ नाना शंकरशेट यांचे चरित्र,

   लेखक : विनायकराव माधवराव पितळे, मुंबई वैभव प्रेस ई. स. १९१६,

   प्रकाशक : विनायकराव माधवराव पितळे चिराबझारनजीक घर नंबर १३७ कॅव्हेल मुंबई.

   सदरील पुस्तकामध्ये श्रीमंत नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे बालपण, सामाजिक, शैक्षणिक कार्य, राजकीय कार्य, धार्मिक कार्य व कायदे कौशल्यात बजावलेली कामगिरी व नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या स्मरणात ठेवण्यासारख्या कांही विशेष गोष्टींचे विस्तृत वर्णन केले आहे.

2. समाजपुरुष जगन्नाथ शंकरशेट,

   लेखिका : अमला नेवाळकर, गंधर्व वेद प्रकाशन.

   सदरील पुस्तकात नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे शैक्षणिक कार्य, सामाजिक बदलाचे कार्य, मूलभूत सेवा व कार्य व आर्थिक क्षेत्रातील सहभाग ह्या गोष्टींचा समावेश करण्यात आलेला आहे.

3. चैतन्याचे चांदणे,

   लेखक : डॉ. यशवंत पाटणे, संस्कृती प्रकाशन.

   सदरील पुस्तकात पान क्रमांक 87 ते 90 यामध्ये ‘ मानवतेचा महासागर ’ या शीर्षकाखाली नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे शैक्षणिक, सामाजिक व राजकीय योगदान तसेच आशिया खंडातील पहिली रेल्वे सुरू केल्याबद्दल चे वर्णन आहे.

4. नामदार जगन्नाथ उर्फ नाना शंकरशेट जीवन व कार्य,

   लेखिका : डॉ. सुरेखा सावंत, हर्ष प्रकाशन.

   सदरील पुस्तकात नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे सामाजिक व राजकीय कार्य अधोरेखित केले आहे.

5. पुण्यश्लोक जगन्नाथ उपाख्य नाना शंकरशेट चरित्र,

   लेखक : बा.द. महात्मे, नीरज प्रकाशन.

   सदरील पुस्तकात नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे चरित्र वर्णन केले आहे.

6. द्रष्टा कर्मयोगी नामदार शंकरशेट,

   लेखक : रविंद्र माहिमकर, आपलं प्रकाशन.

   सदरील पुस्तकात नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे द्रष्टेपण वर्णन केले आहे.

6. संशोधनातील अंतर (Research Gap)

प्रस्तुत संशोधन कार्यापूर्वी या विषयाच्या अनुषंगाने राज्यशास्त्र विषयात संशोधन कार्य झाल्याचे जाणवत नाही. त्यामुळे संशोधनातील अंतर स्पष्टपणे व्यक्त करता येत नाही. परंतु या विषयाच्या अनुषंगाने जे लिखाण झालेले आहे ते विखुरलेल्या स्वरूपात आहे. या निमित्ताने या सर्व लिखाणास संशोधनाचा दर्जा देऊन एकसंघ स्वरूपात स्पष्ट केले जाईल.

7. संशोधन पद्धती (Research Methodology)

प्रस्तुत संशोधन विषयासाठी पुढील संशोधन पद्धतींचा आधार घेतला जाईल. संशोधन पद्धतीच्या चौकटीत राहूनच प्रस्तुत संशोधन पूर्ण केले जाईल. या विषयावरील संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी ऐतिहासिक, ग्रंथालयीन, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतींचा आधार घेतला जाईल.

8. तथ्य संकलन (Data Collection)

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी तथ्यांची आवश्यकता असते. या तथ्यांचे संकलन खालील पद्धतीतून पूर्ण केले जाईल.

1. प्राथमिक तथ्य संकलन (Primary Source)

प्राथमिक तथ्य संकलनामध्ये नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे आज हयात असलेल्या नातेवाईकांची मुलाखत, त्यांनी लिहिलेले ग्रंथ, त्यांनी केलेला पत्रव्यवहार, मुंबई प्रांताच्या कौन्सिलचे सदस्य म्हणून त्यांनी मांडलेले ठराव, केलेली विकास कामे या सर्वांचा अभ्यास करून तथ्य संकलन केले जाईल.

2. दुय्यम तथ्य संकलन (Secondary Source)

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी दुय्यम तथ्य संकलनाच्या पद्धतीचा आधार घेतला जाईल. ज्यामध्ये नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे व्यक्तिमत्व, जीवन चरित्र, विचार व कार्यावर लिहिलेली विविध ग्रंथसंपदा, नियतकालिके, वर्तमानपत्रातील, त्यांच्यावरील स्फुट लेखन या सर्वांचा आधार घेऊन तथ्य संकलन केले जाईल.

9. संशोधनातील नाविन्य (Innovation in Research)

प्रस्तुत संशोधन कार्य मानव्य विद्याशाखेतील राज्यशास्त्र या महत्वाच्या विषयांतर्गत होणार आहे. राज्यशास्त्र या विषयात राजकीय नेतृत्व त्यांनी केलेल्या सामाजिक व

राजकीय सुधारणांचा अभ्यास केला जातो. त्याचाच एक भाग म्हणून नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे व्यक्तिमत्व विचार व कार्यचा संशोधनाच्या चौकटीत राहून स्पष्ट करण्याचा प्रयत्न या संशोधनातून होणार आहे. यापूर्वी असा प्रयत्न झाल्याचे तथ्य संकलनाच्या दरम्यान प्राथमिक स्वरूपात जाणवले नाही. याचा अर्थ प्रस्तुत संशोधन नवीनच आहे. तसेच नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या सामाजिक व राजकीय सुधारणांची महाराष्ट्राला ओळख करून देण्याचा प्रयत्न होईल.

10. संशोधनाची उपयुक्तता (Utility of Research)

“नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या सामाजिक, राजकीय विचार व कार्याचा विश्लेषणात्मक अभ्यास,” या विषयावर होणाऱ्या संशोधनाची विविध अंगाने उपयुक्तता स्पष्ट करता येते या उपयुक्ततेस संशोधकाने खालील बाबीतून स्पष्ट केले आहे.

1. सामाजिक उपयुक्तता

प्रस्तुत संशोधन हे सामाजिक अंगाने उपयुक्त ठरते कारण या संशोधनातून नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे व्यक्तिमत्व आजच्या पिढीला कसे प्रेरणादायी आहे हे स्पष्ट होईल. वर्तमान समाजात असणाऱ्या अनेक सामाजिक समस्या नष्ट करण्याची दिशा नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या सामाजिक सुधारणेतून मिळते.

2. निती निर्धारणासाठी उपयुक्तता

प्रस्तुत संशोधन कार्य वर्तमानातील शासकीय व प्रशासकीय क्षेत्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सामाजिक व राजकीय क्षेत्रातील सुधारणा कशा पद्धतीने जनहिताच्या असाव्यात त्याबद्दलची नीती ठरविण्यासाठी उपयुक्त होईल.

3. संकल्पनात्मक उपयोगिता

राज्यशास्त्र या विषयांतर्गत तत्त्वज्ञ राजा, आदर्श राजकीय नेतृत्व यांचा अभ्यास केला जातो. नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे व्यक्तिमत्व व राजकीय नेतृत्व या राज्यशास्त्रातील संकल्पनेत भर टाकणारे असेल असे मला वाटते.

11. संशोधन आराखडा (Research Design)

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधन आराखड्याची मांडणी पुढील प्रकरणांद्वारे करण्यात येईल.

प्रकरण - 1. प्रस्तावना

नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे सामाजिक व राजकीय क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास करण्यासाठी पार्श्वभूमीचे विवेचन करण्यात येईल.

प्रकरण - 2. संशोधन पद्धती

सदरील संशोधनामध्ये वापरण्यात येणाऱ्या संशोधन पद्धतींचा ऊहापोह या प्रकरणात करण्यात येईल.

प्रकरण - 3. नाना जगन्नाथ शंकरशेट : यांचे व्यक्तिमत्व व जडणघडण

या प्रकरणामध्ये नाना जगन्नाथ शंकरशेट यांचे प्रारंभिक जीवन व त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण - 4. नाना जगन्नाथ शंकरशेट कालीन सामाजिक व राजकीय परिस्थिती

प्रस्तुत प्रकरणात नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या कारकिर्दीतील सामाजिक तथा राजकीय परिस्थितीचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण - 5. नाना जगन्नाथ शंकरशेट : सामाजिक विचार व कार्य

प्रस्तुत प्रकरणात नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या सामाजिक विचार व कार्याचा उहापोह करण्यात येईल.

प्रकरण - 6. नाना जगन्नाथ शंकरशेट : राजकीय विचार व कार्य

या प्रकरणात नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या राजकीय विचार व कार्याचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण - 7. नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या विचारांची व कार्याची उपयुक्तता

सदरील प्रकरणामध्ये वर्तमानकालीन स्थितीमध्ये तसेच भविष्यामध्ये नाना जगन्नाथ शंकरशेट यांच्या विचारांची व कार्याची उपयुक्तता अभ्यासली जाईल.

प्रकरण - 8. निष्कर्ष

अभ्यासाअंती व्यक्त होणारे निष्कर्ष सदरील प्रकरणात स्पष्ट केले जातील.

उपरोक्त संशोधन आराखड्यात संशोधन कालावधी दरम्यान प्राप्त होणाऱ्या तथ्य संकलनानुसार बदल होऊ शकतो.

संदर्भसूची :

१. डॉ. माधव रा. पोतदार, भारताचा पहिला राष्ट्रपुरुष , अनुबंध प्रकाशन.

२. पू. बा. कुलकर्णी , ना. नाना शंकरशेट यांचे चरित्र काळ व कामगिरी, नाना जगन्नाथ शंकर शेट चरित्र प्रकाशन समिती ,मुंबई.

३. डॉ. सुरेखा सावंत ,ना. जगन्नाथ उर्फ नाना शंकरशेट जीवन व कार्य, हर्ष प्रकाशन

४. श्याम भुर्के ,मॅनेजमेंट गुरु जगन्नाथ शंकरशेट, स्नेहल प्रकाशन

५. गंगाधर गाडगीळ,प्रारंभ-कादंबरी , पॉप्युलर प्रकाशन

६. विनायकराव माधवराव पितळे ,श्रीमंत नामदार जगन्नाथ शंकरशेट उर्फ नाना शंकरशेट यांचे चरित्र, मुंबई वैभव प्रेस

७. Dr.P.P. Shirodkar, Hon. Jagannath Shankarset
Prophet of India's resurgence and maker of modern Bombay Three
Volumes Magnum Opus , Pradnya -Darshan Prakashan.

८. प्रदीप आगलावे, सामाजिक संशोधन पद्धती

संशोधकाचे नाव

सौ. प्रगती रामराव डांगे

मार्गदर्शकाचे नाव

डॉ. रत्नाकर बाबुराव लक्षटे
प्राध्यापक व विभाग प्रमुख
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग
देगलुर महाविद्यालय, देगलुर
ता. देगलुर, जि. नांदेड